ePaper

## राहुल गांधींच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता; BJPचे निवडणूक आयोगाला पत्र



| वर्ष - 7 | अंक - 198 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 26 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- पंड्या पुन्हा मुंबई इंडियन्सकडे?
- 'झिम्मा 2'चा खेळही हाऊसफुल्ल!
- कामगारांच्या सुटकेला विलंब का?
- ३ डिसेंबरनंतर देशात नरसंहार


# उद्योगनगरीच्या चाकांना गती!

## » दिवाळी संपली : कामगार परतले कर्मभूमीत!

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**दिवाळीमध्ये परगावातील आणि राज्यातील कामगार सुट्टीवर गेल्यामुळे कंपन्यातील नियमीत कामांची गती मंदावली होती. पाच दिवस उत्पादन ठप्प झाले होते. सध्या सुट्टी संपवून कामगार कामावर रूजू झाल्याने दोन दिवसांपासून शहरातील कंपन्यांचे कामकाज पूर्वपदावर आले आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरात 15 हजारांपेक्षा अधिक मोठे व लघु उद्योजक आहेत. या कंपन्यांमध्ये पुणे जिल्ह्याबाहेरच्या कामगारांसह परराज्यातील कामगारांचा देखील मोठा भरणा आहे. तीन शिफटमध्ये हे कामगार काम करत आहेत.

त्यामुळे दररोज उद्योगांची चाके मोठ्या वेगात फिरत असून कोट्यवधी रुपयांची वार्षिक उलाढाल होत आहे. कंपन्यांच्या या उत्पादन प्रक्रियेला दिवाळीमध्ये ब्रेक लागला.

बाहेर गावातील तसेच राज्यातील कामगार सुट्टी घेऊन गेल्यामुळे कंपन्या चार ते पाच दिवस बंद ठेवण्याची वेळ काही जणांना आली. तर काहींनी मोजक्याच कामगारांच्या उपस्थितीत धीम्या गतीने उत्पादन सुरूच ठेवले.

सध्या दिवाळीच्या सुट्टी संपवून कामगार पुन्हा कामावर रूजू होत आहेत. त्यामुळे उद्योग पुर्वपदावर आल्याचे कंपन्यांकडून सांगण्यात येत आहे.





### मोठ्या कंपन्यांमध्ये दुप्पट पगार

**» पिंपरी-चिंचवड शहरात कुटुंबासह राहणाऱ्या कामगारांनी सुट्टी घेतली नाही. सणाच्या दिवशीही मोठ्या कंपन्यांमध्ये कामावर जाण्यास काही कामगारांनी पसंती दिली. अशा कामगारांसाठी दररोजच्या पगाराच्या दुप्पट पगार देण्याची योजनाही मोठ्या कंपन्यांनी राबविल्या आहेत. सणाच्या दिवशी काम केल्याने कंपन्यांचे उत्पादन चालूच ठेवल्याचे बक्षिस म्हणून कामगारांना हे मानधन दिले जात आहे.**

# डुडूळगाव परिसरातील पाणीपुरवठा होणार सक्षम!

## » आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

### » स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांसह ग्रामस्थांनी व्यक्त केले समाधान

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून डुडूळगाव येथे तब्बल १५ लक्ष लीटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यात आली. त्यामुळे पाणी पुरवठा सक्षम होणार असून, स्थानिक नागरिक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.**

भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक ३ मधील डुडूळगाव येथे पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. त्याचे लोकार्पण आज करण्यात आले.

यावेळी रमेश वहिले, योगेश तळेकर, सचिन तळेकर, चिखली-मोशी-चऱ्होली हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, राजेश सस्ते, गणेश सस्ते, वंदना आल्हाट, विक्रम वहिले, सागर वहिले, दादा पवार, सचिन पवार, महापालिकेचे कार्यकारी अभियंता रामनाथ टकले, कनिष्ठ अभियंता सुधाकर चव्हाण, विजय लाडे आदी उपस्थित होते. या नवीन जलकुंभामुळे धायकरवस्ती, राजमाता कॉलेज परिसर, दत्तनगर, माउलीनगर, एसपी कॉलेज परिसर, ऑस्ट्रिया सोसायटी परिसर, डुडूळगाव गावठाण आदी भागाचा पाणीपुरवठा सक्षम होणार आहे. स्थानिक नागरिक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



> २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीदरम्यान 'भोसरी व्हीजन- २०२०' अभियानांतर्गत समाविष्ट गावांतील पाणीपुरवठा सक्षम करण्याचा संकल्प आम्ही केला होता. महापालिकेच्या माध्यमातून डुडूळगाव, चोविसावाडी, वडमुखवाडी व चऱ्होली आदी भागांमध्ये मुख्य जलवाहिनी आणि आठ ठिकाणी पाण्याच्या टाक्या उभारण्यात येणार आहेत. तसेच, आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पामुळे समाविष्ट गावांचा पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल, असा विश्वास आहे.
>
> **-महेश लांडगे, आमदार, अध्यक्ष, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड...**

# शिक्षणात आरक्षणाची मुस्लीम धर्मीयांची मागणी

## आरक्षण न दिल्यास रस्त्यावर उतरुन आंदोलनाचा इशारा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारने शिक्षणात मुस्लीम धर्मीयांना पाच टक्के आरक्षण न दिल्यास मराठा आणि धनगर समाजाप्रमाणे रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा ऑल इंडिया उलेमा बोर्डाने शनिवारी दिला. उर्दू शाळांमध्ये अरेबिक भाषा सक्तीची करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.**

राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित शाळांमधील भौतिक




ऑल इंडिया उलेमा बोर्डाच्या कार्यकारिणीची बैठक नुकतीच पुण्यात झाली. या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती बोर्डाच्या वक्फ कक्षाचे अध्यक्ष सलीम सारंग यांनी शनिवारी दिली. मौलाना इूनाई हुसेनी, नानशद सिदिक्की, फैजल शेख, मोईन सिद्दीकी, आयुब जमादार, माहद जाहिर, अंजुम शेख, अहमद तेली या वेळी उपस्थित होते. सारंग म्हणाले की, शिक्षणात मुस्लीम धर्मीयांना पाच टक्के आरक्षणाची तरतुद अंमलात आणावी, अन्यथा मुस्लीम समुदायाला रस्त्यावर येऊन आंदोलन करण्याशिवाय कोणताही पर्याय राहणार नाही. मुस्लीम समुदायाच्या मूलभूत गरजांकडे ऑल इंडिया उलेमा बोर्ड डोळेझाक करू शकत नाही. भलेही मुस्लीम समुदायाला एखाद्या उमेदवाराला निवडणुकीत हमखास विजयी करता येणार नाही. मात्र, हा मतदार कोणत्याही उमेदवाराला निवडणुकीत निश्चितपणे पराभूत करु शकतो, हे राजकीय मंडळींनी लक्षात ठेवावे. आम्ही आमच्या मागण्या मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविल्या आहेत. आतापर्यंत तरी त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आलेला नाही. मात्र आम्ही आशावादी आहोत. महाराष्ट्रात मुस्लिमांना शिक्षणात पाच टक्के आरक्षण द्यावे, याला न्यायालयाने मान्यता दिली असली तरी एकाही सरकारने अंमलबजावणीसाठी उत्सुकता दाखवलेली नाही. शिक्षणात आरक्षणाची मागणी पुढे जावी यासाठी आम्ही मुस्लीम धर्मातील विचारवंत, समाजातील नेते, राजकीय व्यक्ती यांच्याशी संवाद सुरु केला आहे. ही मागणी मान्य झाली नाही तर आंदोलनाशिवाय आमच्यासमोर पर्याय राहणार नाही, असे सारंग यांनी सांगितले. आखाती देशात नोकरी मिळवण्यासाठी अरेबिक भाषेचे ज्ञान ही अतिरिक्त गुणवत्ता मानली जाते, याकडे लक्ष वेधून सारंग म्हणाले की, राज्यातील उर्दु माध्यमाच्या सर्व शाळांमध्ये अरेबिक भाषा हा विषय सक्तीचा असला पाहिजे. राज्यात वक्फ बोर्डाकडून व्यवस्थापन होत असलेल्या अनेक मालमत्तांवर अतिक्रमण झाले आहे.

### पाच टक्के आरक्षणाची तरतुद

शिक्षणात मुस्लीम धर्मीयांना पाच टक्के आरक्षणाची तरतुद अंमलात आणावी, अन्यथा मुस्लीम समुदायाला रस्त्यावर येऊन आंदोलन करण्याशिवाय कोणताही पर्याय राहणार नाही. मुस्लीम समुदायाच्या मूलभूत गरजांकडे ऑल इंडिया उलेमा बोर्ड डोळेझाक करू शकत नाही. भलेही मुस्लीम समुदायाला एखाद्या उमेदवाराला निवडणुकीत हमखास विजयी करता येणार नाही. मात्र, हा मतदार कोणत्याही उमेदवाराला निवडणुकीत निश्चितपणे पराभूत करु शकतो, हे राजकीय मंडळींनी लक्षात ठेवावे. आम्ही आमच्या मागण्या मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविल्या आहेत. आतापर्यंत तरी त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आलेला नाही. मात्र आम्ही आशावादी आहोत.

# मोदी पुन्हा सत्तेवर आले तर भारत जगातील तिसरी महासत्ता

## केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी व्यक्त केला विश्वास

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दहा वर्षांपूर्वी भारताची अर्थव्यवस्था डबघाईला आली होती. परदेशात भारतीय व्यापारी, उद्योजकांना फारसे महत्त्व दिले जात नव्हते. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर डबघाईस आलेली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांना काम केले. कमकुवत बाजूंचा विचार न करता देशाची आर्थिक व्यवस्था सशक्त करण्यासाठी प्रयत्न केले.**

पायाभूत सुविधांचा विस्तार केला. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरली आहे.

मोदी पुन्हा सत्तेवर आले तर, आपली अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची ठरेल, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी व्यक्त केला. दि पूना मर्चंट्स चेंबरकडून व्यापारमहर्षी स्व. उत्तमचंदजी तथा बाबा पोकर्णा यांच्या स्मृतीदिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या आदर्श व्यापारी पुरस्काराचे वितरण गोयल




यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अरुण दांडेकर, रमेश कोंढरे, पुरुषोत्तम लोहिया, राजेश शहा, शुभम गोयल यांना व्यापारक्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रवीण डोके यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. एस. के. जैन, लायन्स क्लबचे विजय भंडारी, चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, उपाध्यक्ष अजित बोरा, सचिव रायकुमार नहार, प्रवीण चोरबेले, उत्तम बाठिया, ज्येष्ठ व्यापारी वालचंद संचेती, आशिष दुगड, दिनेश मेहता, नवीन गोयल यावेळी उपस्थित होते. भारतीय जनता पक्ष सत्तेवर येण्यापूर्वी देशाची अर्थव्यवस्था कमकुवत होती. अर्थव्यवस्था ढासळत असताना कोळसा, दूरसंचार घोटाळ्याचे प्रकार उघडकीस आले होते. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने बहुमत मिळवले.

अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्यासाठी वित्तीय तुटीचा दर कमी करण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे गेल्या दहा वर्षात महागाईचा दर साडेचार टक्के ते सात टक्के राहिला. व्याज दर कमी झाले. परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिल्याने गुंतवणुकीत मोठी वाढ झाली. निर्यातवाढीसाठी चालना देण्यात आली. सामान्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या.

समाजातील वंचित घटकांना घरे उपलब्ध करुन दिली. उज्वला गॅस योजना राबविली. अनेक महत्तपूर्ण योजना राहवून सामान्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. भ्रष्टाचार मुक्त प्रशासनामुळे नागरिकांचा मोदी सरकारवरचा विश्वास वाढला, असे गोयल यांनी नमूद केले.

## महेशदादा... शिवछत्रपतींची इच्छा पूर्ण करा!

# गायीचे रक्षण केलीयाचे पुण्य बहूत!

### मिलिंद एकबोटे यांचे आवाहन : मोशीत देशी गोवंश-अश्व पशू प्रदर्शन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत हा महाशक्ती झाला पाहिजे, असे म्हटले जाते. त्यासाठी गोशक्ती सक्षम झाली पाहिजे. भारत जेव्हा स्वतंत्र झाला. गायीच्या गोमूत्राला जुनागड विद्यापीठाने 'लिक्विड गोल्ड' असे नाव दिले. गायीचे शेणसुद्धा मौलवान आहे. "गायीचे रक्षण केलीयाचे पुण्य बहूत आहे..." असे छत्रपती शिवाजी महाराज यांचे वचन आहे. असे असतानाही महाराष्ट्रात गोहत्या केली जाते, ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे आणि सहकाऱ्यांनी "गोहत्यामुक्त महाराष्ट्र" निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी केले.**



अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे, शिवप्रतिष्ठान हिंदूस्थानचे पुणे जिल्हा प्रमुख संजय जठार, विधान परिषदेचे आमदार गोपिचंद पडळकर यांच्याहस्ते मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या मैदानावर देशी गोवंश व अश्व पशू प्रदर्शन व आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी पशूसंवर्धन आयुक्त विश्वास भोसले, पशू संवर्धन विभागाचे सहआयुक्त, पुणे डॉ. संतोष पंचभोर, जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त डॉ. अंकूश परिहार, अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे संदीप बोदगे, अण्णासाहेब मगर बँकेचे चेअरमन नंदू लांडे, माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार गोपिचंद पडळकर म्हणाले की, आमदार महेश लांडगे यांचे व्यक्तीमत्व बहुआयामी आहे. हिंदूप्रेमी, बैलागाडा प्रेमी, गोप्रेमी, कुस्तीप्रेमी असे अनेक पैलू त्यांचे आहेत. त्यांचा हिंदूत्ववादी चेहरा दिवसेंदिवस उजळतो आहे.'

अत्यंत धाडसाने ते भूमिका घेतात. त्याचे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वागत होते. देशी गोवंश व अश्व प्रदर्शन हे गोवंश वाचवण्याच्या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणार आहे.

#### गोवंश व पशूंसाठी 'रॅम्पवॉक'...

महाराष्ट्रभरातून तसेच देशातील विविध राज्यातून साडेपाचशेहून अधिक शेतकरी व गोवंशपालक उपस्थित होते. या पशुप्रदर्शनामध्ये खिल्लार, देवणी, लालकंधारी, थारपारकर, म्हैस, रेडा, कांकरेंज, गीर, डांगी, साहिवाल, पुंगनूर, मालनाड गिड्डा, कपिला गाय बैल तसेच मारवाडी व भीमथडी अश्व मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे 'रॅम्प वॉक' होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे.

#### आमदार लांडगे यांना 'हिंदूत्व शौर्य' पुरस्कार...

आमदार लांडगे यांनी गोसंवर्धन आणि प्रखर हिंदूत्वाची भूमिका घेतली आहे. हिंदूत्वाच्या मुद्यावर विधानसभा आणि सार्वजनिक जीवनात त्यांची आक्रमक भूमिका महाराष्ट्रातील हिंदूत्ववादी कार्यकर्ते, नागरिकांसाठी प्रेरणा देणारी आहे. त्यामुळे यावर्षीचा 'हिंदूत्व शौर्य' पुरस्कार त्यांना जाहीर करतो, अशी घोषणा यावेळी अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद एकबोटे यांनी केली. डिसेबर- २०२३ मध्ये पुण्यात हिंदूत्ववादी संघटना, संत-महात्मे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमामध्ये आमदार लांडगे यांना हा पुरस्कार व सोन्याचे कडे देवून गौरविण्यात येईल.

---

# इंग्रजी भाषेवरील प्रभूत्व महत्त्वाचे!

### विद्यार्थ्यांना मार्गदर्शन : पिअर अकॅडमी ऑस्ट्रेलियातर्फे माहिती सत्र

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'पिअर अकॅडमी ऑस्ट्रेलिया यांच्या वतीने नुकतेच पुण्यातील डी.वाय. पाटील नर्सिंग कॉलेजमध्ये परदेशातील आरोग्य क्षेत्रातील करिअर, परीक्षा व इंग्रजी भाषा या विषयावर माहितीपूर्ण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वैद्यकीय आणि पॅरामेडिकल शाखेतील प्राध्यापक आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पिअर अकॅडमीच्या सीईओ दलजित कौर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**



या सत्रात इंग्रजी भाषेच्या प्राविण्य चाचण्या जसे की ओईटी (व्यावसायिक इंग्रजी चाचणी), टोफेल (परकीय भाषा म्हणून इंग्रजीची चाचणी) आणि पीटीई (इंग्रजीची पिअर्सन चाचणी) यांसारख्या इंग्रजी भाषेच्या प्रावीण्य चाचण्यांमध्ये यशस्वी होण्यासाठीची धोरणे आणि अंतर्दृष्टी प्रदान करण्यावर भर देण्यात आला.

जागतिक स्तरावर संधींचा पाठपुरावा करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांसाठी या चाचण्या महत्वपूर्ण आहेत.

या सत्रामध्ये पिअर अकॅडमी प्रदान करत असलेल्या विविध सेवांवर प्रकाश टाकला, ज्यामध्ये ओईटी प्रमाणपत्रानंतर परदेशात काम करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना एमिग्रेशन व्हिसा सदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचा समारोप प्रश्नोत्तर सत्राने झाला. विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी पिअर अकॅडमीच्या टीमशी चर्चा करून इंग्रजी भाषा चाचण्यांच्या विविध पैलूंबद्दल आणि त्यानंतरच्या करिअरच्या मार्गांबद्दल सखोल समज आणि स्पष्टता प्राप्त केली.

#### डी. वाय. पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांना संधी

इंग्रजी भाषा प्राविण्य आणि आंतरराष्ट्रीय आरोग्य सेवा करिअर यांच्यातील अंतर भरून काढण्याच्या पिअर अकॅडमीच्या प्रयत्नांमधील एक महत्त्वाचा क्षण म्हणून डी. वाय. पाटील नर्सिंग कॉलेजमधील माहिती सत्र यशस्वी ठरले. या सत्राच्या आयोजनासाठी डी. वाय. नर्सिंग कॉलेजचे व्यवस्थापन व प्राचार्या डॉ. खुर्शीद जमादार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



## भूमिका

**व्हीआयपीजच्या बंदोबस्तात व्यग्र असलेले पोलीस. त्यांची वाट बघत तासंतास ताटकळणारे तक्रारदार, वर्षानुवर्षे रखडलेले, खिसा रिता करणारे खटले, वकिलांच्या विरोधात प्रचंड मोबदला घेऊन खटला लढणारे बचाव पक्षाचे वकील, जुनाट साधनसामुग्रीनिशी गुन्ह्यांचा माग काढण्यासाठी झगडणाऱ्या न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा देशातील न्यायव्यवस्थेची ही सद्यस्थिती आहे.**

# महिलांविरोधातील गुन्ह्यांकडे दुर्लक्षच



भारतात गुन्हे सिद्ध होऊन गुन्हेगाराला शिक्षा होण्याचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा कमी आहे, ते त्याचमुळेच! सदैव तुडुंब भरलेले तुरुंग, त्यात खटल्याचा निकाल लागण्याच्या प्रतीक्षेत वर्षानुवर्षे खितपत पडलेले कैदी यालाही ही संथ व्यवस्थाच कारणीभूत आहे. अशा या प्रचंड विस्कळीत व्यवस्थेत ज्याच्या बाबतीत गुन्हा घडला आहे, अशा पीडिताचे स्थान काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणखी एका प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल- तक्रारदाराच्या लैंगिक ओळखीचा आणि न्याय मिळण्याच्या वेगाचा किंवा शक्यतेचा संबंध काय? अनेकदा पीडित महिलांविषयी आणि काही वेळा महिला आरोपी किंवा गुन्हेगारांविषयीही काळजी व्यक्त होताना दिसते. त्यामुळेच महिलांच्या पोलीस दलातील आणि न्यायव्यवस्थेतील सहभागाला प्रोत्साहन दिले जाते. पोलीस दलातील महिलांचे प्रमाण अवघे १२ टक्के आहे. पोलीस, सरकारी वकील, न्याययवैद्यक शास्त्रज्ञ, तुरुंग अधिकारी किंवा न्यायव्यवस्थेतील अधिकारी अशी पदे भूषविणाऱ्या महिलांची संख्या हळूहळू का असेना, वाढू लागली आहे. या पार्श्वभूमीवर, निर्विकार जस्सल यांनी 'न्यायदानात व्यक्तीचे लिंग महत्त्वाचे ठरते का?- भारतातील पोलीस आणि न्यायव्यवस्थेचा महिलांसंदर्भातील खटल्यांना प्रतिसाद' या विषयावर केलेल्या अभ्यासाचा अहवाल 'अमेरिकन पोलिटिकल सायन्स असोसिएशन'च्या वतीने 'केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रे"ने नुकताच प्रकाशित केला. भारतात महिलांबाबत बहुआयामी विषमता असल्याचे त्यातून स्पष्ट झाले. न्यायदानाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांना पुरुषांपेक्षा वेगळी वागणूक दिली जाते. सामान्यपणे पोलीस ठाणी नागरिकस्नेही नसतात आणि विशेषत: महिला पोलीस चौकीचा उंबरठा ओलांडण्यास तयार नसतात. यावर उत्तर म्हणून दशकभरापूर्वी 'ऑल विमेन पोलीस स्टेशन्स' (एडब्ल्यूपीएस)ची संकल्पना पुढे आली. महिलांसंदर्भातील गुन्ह्यांच्या तक्रारी दाखल होण्याचे प्रमाण वाढत गेले, त्याबरोबरच पोलीस ठाण्यांतील महिलांची संख्याही वाढत गेली आणि एडब्ल्यूपीएसपेक्षा पोलीस ठाण्यांतील महिलांची उपस्थिती अधिक स्वीकारार्ह ठरली. जवळपास सर्वच राज्यांनी पोलीस दलांत महिलांना आरक्षण देण्याचा पर्याय स्वीकारला. महिलांविरोधातील गुन्ह्यांचा वेगाने निपटारा व्हावा म्हणून विशेष न्यायालयेही स्थापन करण्यात आली आहेत. आणि तरीही वर नमूद केलेल्या अभ्यासातून महिलांना गुन्ह्याचा तपास आणि सुनावण्यांच्या विविध स्तरांवर अयोग्य वागणूक मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे. हा अभ्यास हरियाणा या राज्यात करण्यात आला. त्यात म्हटले आहे की तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यात गेलेल्या महिलांना पुरुषांच्या तुलनेत अधिक काळ तिष्ठत राहावे लागते. त्यांच्याबरोबर एखादा पुरुष असेल, तर मात्र लवकर दखल घेतली जाते. तक्रारदार महिला असेल, तर तपासास विलंब केला जातो आणि महिलांनी केलेल्या तक्रारी न्यायालयापर्यंत पोहोचण्याचे प्रमाणही कमी आहे. महिलांच्या तक्रारींवर आधारित खटले निकाली काढण्याचे आणि आरोपी निर्दोष अथवा पुराव्यांअभावी मुक्त होण्याचे प्रमाण अधिक आहे. अभ्यासकांनी दोन प्रकारच्या गुन्ह्यांची माहिती गोळा केली. महिलांविरोधातील हिंसाचार आणि इतर सामान्य गुन्हे. अहवालात म्हटले आहे की "तक्रारदार महिला असेल, तर आरोपीला शिक्षा ठोठावली जाण्याची शक्यता नक्कीच कमी असते. मग ती हिंसाचाराची तक्रार असो वा अन्य कोणतीही." हा अभ्यास संपूर्ण देशातील स्थितीविषयी असल्याचा दावा केला जात असला, तरीही तो केवळ एकाच राज्यात करण्यात आला असल्यामुळे त्यातून संपूर्ण देशातील स्थितीचे चित्र स्पष्ट होत नाही. केरळसारख्या राज्यांत पूर्ण वेगळे चित्र असू शकते, मात्र तरीही उपस्थित करण्यात आलेले मुद्दे खरोखरच गंभीर आहेत. पुरुष पोलीस अधिकारी महिलांच्या तक्रारी फारशा गांभीर्याने घेत नाहीत आणि त्यांना बराच काळ ताटकळत ठेवतात.

## संपादकीय »

# कुणाचे पारडे जड?

***देशभरामध्ये सध्या तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, मिझोराम आणि छत्तीसगड या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांची चर्चा होत आहे.***

यापैकी तेलंगणामध्ये विधानसभेच्या 119 जागांसाठी 30 नोव्हेंबरला मतदान होत आहे. 2 जून 2014 रोजी आंध्र प्रदेशपासून वेगळे करून तेलंगणाची स्थापना झाली. पहिल्या विधानसभा निवडणुकीत टीआरएसने 63 जागा जिंकल्या होत्या आणि के. चंद्रशेखर राव हे पहिले मुख्यमंत्री झाले. आता तेलंगणा तिसऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज आहे. यावेळी भारत राष्ट्र समिती (पूर्वीची तेलंगणा राष्ट्र समिती) आणि काँग्रेस यांच्यात लढत आहे. यावेळी भाजप, एआयएमआयएम, जनसेना हे पक्षही निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तेलंगणा राज्याच्या स्थापनेनंतर 2014 च्या विधानसभा निवडणुकीत तेलंगणा राष्ट्र समिती हा सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आणि राज्यात पहिले सरकार स्थापन केले. त्यावेळी काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर होती. टीआरएसने त्यावेळी 63 जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसला 21 जागा मिळाल्या होत्या.

**भारतीय संविधानाच्या निर्मितीला येत्या २६ नोव्हेंबर रोजी ७४ वर्षं पूर्ण होतील, म्हणजे तेव्हापासून आपल्या राज्यघटनेचं अमृतमहोत्सवी वर्ष सुरू होईल. अशा वेळी वास्तविक डॉ. आंबेडकरांचा राज्यघटनेमागचा विचार पुढे घेऊन जाण्याच्या दृष्टीने काय करता येईल त्याचा विचार व्हायला हवा. परंतु, या संदर्भात सध्याच्या सत्ताधाऱ्यांचा आशीर्वाद असलेल्या काही जणांचे प्रयत्न चक्र पूर्णतः उलट दिशेनं नेण्याचे असल्याचं दिसून येतं.**

# संविधानाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतला फरक

असं का व्हावं? राज्यघटनेच्या वारशाला बोल लावण्याची सुरुवात हल्ली झाली आहे, ती का व्हावी? यासाठी राज्यघटनेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतला फरक समजून घेतला पाहिजे. त्या फरकामुळे संविधानाचं – पर्यायानं देशाचं- काय नुकसान होऊ शकतं हेही समजून घेतलं पाहिजे. राज्यघटनेकडे बघण्याचे भारतात मुख्य तीन दृष्टिकोन आहेत. आंबेडकरी समूह हळूहळू भारतीय राज्यघटनेकडे एक राजकीय दस्तावेज म्हणून नाही तर, महामानवाने तयार केलेला पवित्र ग्रंथ म्हणून त्याकडे भक्तिभावाने पाहात गेला. दुसरा दृष्टिकोन संघ परिवारातल्या अनेकांनी बोलून दाखवलेला – "राज्यघटनेत भारतीय काय आहे? ती वेगवेगळ्या देशांच्या राज्यघटनेची मिळून बनवलेली एकत्रित गोधडी आहे" अशा कुत्सित पद्धतीने बघणारा. शंकर सुब्ब अय्यर यांनी संघाचे मुखपत्र 'ऑर्गनायझर'मध्ये 'मनू आमच्या हृदयावर राज्य करतो, असा लेख




लिहून भारतीय राज्यघटनेपेक्षा मनुचा कायदा श्रेष्ठ आहे' असं थेटच प्रतिपादन करून टाकलेलं होतं. त्याचप्रमाणे, सरसंचालक गोळवळकर यांनीही 'मनू जगातील पहिला कायदेतज्ञ आहे आणि त्याच्याकडून भारतीय राज्यघटनेने काहीच घेतले नाही' अशी 'गोड तक्रार' केली होती. तिसरा दृष्टिकोन कम्युनिस्ट पक्षांचा – त्यांनी, या राज्यघटनेत येथील प्रस्थापित भांडवली जमीनदारांचे व त्यांच्या परंपरेचे रक्षण करणाऱ्या वर्गाचे प्रतिबिंब पडले आहे, असा दृष्टिकोन बाळगला. या अशा पार्श्वभूमीवर, आंबेडकरांचा राज्यघटनेबद्दलचा दृष्टिकोन पुन्हा समजून घेण्याची आज नितांत गरज आहे.

याचे महत्त्वाचे कारण म्हणजे दुसरा- संघ परिवार त्याच्या वैचारिक समर्थकांचा- कलुषित दृष्टिकोन पुढे रेटला जातो आहे. याचा ढळढळीत पुरावा ठरतो तो संविधानाच्या मूलभूत रचनेतही बदल करण्याची मागणी सूचकपणे करणारा एक लेख. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अर्थ सल्लागार बिबेक देबरॉय यांनी १५ ऑगस्ट २०२३ रोजी भारतीय राज्यघटनेसंदर्भात एका इंग्रजी दैनिकात हा लेख लिहून असं मत मांडलं की, भारतीय राज्यघटना २०४७ पर्यंत बदलण्याची आवश्यकता आहे. १९५० मध्ये आम्हाला ज्या घटनेचा वारसा मिळाला होता तो आता आमच्याकडे नाही. त्यात अनेकवेळा सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्यांनी पुढे असंही म्हटलं आहे की, "असे असूनही १९७३ पासून आम्हाला सांगण्यात आले आहे की, सरकारला इच्छा असली तरीही, सरकारला राज्यघटनेची 'मूलभूत रचना' (बेसिक स्ट्रक्चर) बदलता येणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 3 डिसेंबरनंतर देशात कुठे ना कुठे नरसंहार

## समाजा-समाजाला लढवलं जातं आहे : प्रकाश आंबेडकर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सध्या देशात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांसाठी मतदान घेतलं जात आहे. या सर्व राज्यांच्या निवडणुकीचा निकाल ३ डिसेंबर रोजी लागणार आहे. या निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मोठं विधान केलं आहे. ३ डिसेंबरनंतर देशात कुठल्या ना कुठल्या भागात नरसंहार घडेल, अशी शक्यता प्रकाश आंबेडकर यांनी वर्तवली आहे. ते संविधान सन्मान महासभेत बोलत होते.**

या सभेतून प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा थेट उल्लेख न करता जोरदार टीका केली. सध्यात देशात आरक्षणाच्या नावाने समाजा-समाजाला एकमेकांच्या विरोधात लढवलं जातं आहे, अशी परिस्थिती आहे. हे थांबवण्याऐवजी खतपाणी घातलं जातं आहे. २००४ मध्ये गोधरा हत्याकांड घडलं, २०२३ मध्ये मणिपूरमध्ये नरसंहार झाला. कदाचित ३ डिसेंबरनंतर देशातील कुठल्या ना कुठल्या भागात नरसंहार घडण्याची शक्यता आहे, हे लक्षात घ्या, असं सूचक विधान प्रकाश आंबेडकर यांनी केलं. "जनतेला माझं आवाहन आहे की, देशात भडकवणाऱ्या संघटना बऱ्याच आहेत. जे भडकवणारे नेते आहेत, त्यांना म्हणा... आधी तुमचा मुलगा पुढे करा मग आम्ही पाठीमागे येतो. स्वत:चं कुटुंब सुरक्षित ठेवायचं आणि लोकांना पुढे करायचं. स्वत:ला इजा होऊ द्यायच्या नाहीत, पण दुसऱ्याला इजा होऊ द्यायच्या, अशा भूमिकेपासून आपण सावध राहायला हवं," असंही प्रकाश आंबेडकर म्हणाले.



वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी देशातील छापेमारीवरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. गेल्या नऊ वर्षात देशातील विविध राजकीय नेत्यांच्या घरी छापेमारी करण्यात आली. मात्र संबंधित नेत्यांवर गुन्हा दाखल केला नाही. शिवाय संबंधित भ्रष्टाचाराचं प्रकरण न्यायालयात न नेता मध्येच लटकावून ठेवल्याचा आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला. ते संविधान सन्मान महासभेत बोलत होते. देशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, "आता हळूहळू जशी सत्ता जात आहे, तसा यांचा कार्यक्रमही बदलत आहे. सगळ्याच गोष्टींचा वापर केला जात आहे. आज सकाळपासून किती धाडी पडल्या, ते मी बघत होतो. माझ्या माहितीप्रमाणे आज देशभरात सात ठिकाणी धाडी पडल्या.

मग गेल्या नऊ वर्षात किती ठिकाणी धाडी पडल्या? याचा विचार करा. ज्यांच्यावर धाडी पडल्या त्यांची चौकशी झाली पण त्यांना न्यायालयात उभं केलं नाही "तुम्ही आमच्या विरोधात जाणार असाल तर आम्ही छापेमारी करू आणि तुम्हाला तुरुंगात पाठवू, अशा धमक्या देऊन येथील व्यवस्थेवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. खऱ्या अर्थाने आपण विचार केला तर आपण या देशाचे मालक आहोत आणि ज्याला निवडून दिलंय, तो आपला नोकर आहे. एवढं लक्षात ठेवा. पण दुर्दैवाने मालकाने आपलं मालकपण सोडलं आहे," असं प्रकाश आंबेडकर यांनी नमूद केलं. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, "उद्या आपण केंद्र सरकारला विचारलं पाहिजे, तुम्ही ज्यांच्यावर आतापर्यंत धाडी टाकल्या, त्यांच्यावर गुन्हे का दाखल केले नाहीत. त्यांना न्यायालयात उभं केलं असतं तर तो आरोपी आहे किंवा नाही? हे न्यायालयाने सांगितलं असतं. पण संबंधितांना न्यायालयात घेऊन जायचं नाही, आपल्याच टेबलवर ऑपरेशन करायला घ्यायचं आणि त्याला सांगायचं, जोपर्यंत तू माझ्याविरोधात बोलत नाहीस, तो पर्यंत तू जिवंत आहेस. ज्यादिवशी तू माझ्याविरोधात बोलशील, त्यादिवशी तुला तुरुंगात टाकल्याशिवाय राहणार नाही, असं राजकारण संविधानाला धरून नाही.

### गांधीचं प्रकाश आंबेडकरांना पत्र

वंचित बहुजन आघाडीने शनिवारी (२५ नोव्हेंबर) मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर (दादर) संविधान सन्मान महासभेचं आयोजन केलं आहे. उद्या देशभरात संविधान दिन साजरा केला जाणार आहे. या संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला वंचितने ही महासभा बोलावली आहे. वंचितने या सभेसाठी देशातील अनेक विरोधी पक्षांना आणि नेत्यांना या सभेचं निमंत्रण दिलं आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हेदेखील या सभेला उपस्थित राहणार आहेत. या सभेत देशाचं संविधान, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय आणि सद्यस्थिती यावर चर्चा केली जाईल. या सभेतून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर देशातील सत्ताधारी नरेंद्र मोदी सरकारवर आणि महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकारवर टीका करण्याची शक्यता आहे.

# भुजबळ पागल माणसासारखं भूमिका बदलतात

## मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळांवर सोडलं टीकास्त्र

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मागील काही दिवसांपासून मराठा आरक्षणावरून राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केल्यानंतर अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेतली. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये, त्यांना वेगळं आरक्षण द्यावं, अशी भूमिका भुजबळांनी घेतली. तसेच त्यांनी अंबड येथील सभेतून मनोज जरांगे यांचा एकेरी उल्लेख करत जोरदार हल्लाबोल केला.**

यानंतर आता बीड येथील जाळपोळीवरून छगन भुजबळांनी मनोज जरांगेंवर टीका केली. बीड येथील हिंसाचार मनोज जरांगे यांनीच घडवून आणला असल्याचा आरोप छगन भुजबळ यांनी केला आहे. भुजबळांच्या आरोपाला मनोज जरांगेंनी उत्तर दिलं आहे. छगन भुजबळ हे पागल माणसासारखं दर तासाला आपली भूमिका बदलतात, अशी खोचक टीका मनोज जरांगेंनी केली. ते छत्रपती संभाजीनगर येथे 'टीव्ही ९ मराठी'शी बोलत होते. बीड येथील हिंसाचाराबाबत भुजबळांनी केलेल्या आरोपांबाबत विचारलं असता मनोज जरांगे म्हणाले, "ते काहीही बोलतात. त्यांना महत्त्व देण्याची गरज नाही. ते पागल झालेल्या माणसासारखं दर तासाला आपली भूमिका बदलतात. त्यांचेच लोक हॉटेल जाळतात आणि हे इतर लोकांचं नाव घेतात. आता त्यांच्याबद्दल काही आस्था राहिली नाही. त्यामुळे त्यांना महत्त्व देण्याची गरज नाही. कारण तो खूप उंचीचा माणूस होता पण त्यांनी स्वत:चा कचरा करून घेतला."



मागील काही दिवसांपासून मराठा आरक्षणावरून राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केल्यानंतर अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये, त्यांना वेगळं आरक्षण द्यावं, अशी भूमिका भुजबळांनी घेतली. मराठा आरक्षणाबाबत छगन भुजबळांची भूमिका वैयक्तिक आहे, या सुनील तटकरेंच्या विधानाबाबत विचारलं असता अजित पवार म्हणाले, "त्याबाबतीत आम्ही ३० आणि १ तारखेला कर्जत येथे राष्ट्रवादी काँग्रेसचं शिबीर आयोजित केलं आहे. तिथे मी माझी भूमिका मांडेन. परंतु माझं स्पष्ट मत आहे की, सत्ताधारी असतील किंवा विरोधक असतील किंवा राजकारणाशी संबंध नसणारे असतील, प्रत्येकाने थोडी सावध भूमिका घेतली पाहिजे. कोणत्याही समाजात तेढ निर्माण होणार नाही किंवा अंतर निर्माण होणार नाही, याबाबतची खबरदारी घेणं ही काळाची गरज आहे."तसेच त्यांनी अंबड येथील सभेतून मनोज जरांगे यांचा एकेरी उल्लेख करत जोरदार हल्लाबोल केला. यानंतर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी छगन भुजबळांच्या वक्तव्यापासून अंतर राखलं आणि ती त्यांची वैयक्तिक भूमिका आहे.

### मी माझी भूमिका मांडेन

मराठा आरक्षणाबाबत छगन भुजबळांची भूमिका वैयक्तिक आहे, या सुनील तटकरेंच्या विधानाबाबत विचारलं असता अजित पवार म्हणाले, "त्याबाबतीत आम्ही ३० आणि १ तारखेला कर्जत येथे राष्ट्रवादी काँग्रेसचं शिबीर आयोजित केलं आहे. तिथे मी माझी भूमिका मांडेन. परंतु माझं स्पष्ट मत आहे की, सत्ताधारी असतील किंवा विरोधक असतील किंवा राजकारणाशी संबंध नसणारे असतील, प्रत्येकाने थोडी सावध भूमिका घेतली पाहिजे. कोणत्याही समाजात तेढ निर्माण होणार नाही किंवा अंतर निर्माण होणार नाही, याबाबतची खबरदारी घेणं ही काळाची गरज आहे."

# कोची विद्यापीठ महोत्सवात चेंगराचेंगरी!

## 4 जणांचा मृत्यू तर अनेक जण जखमी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे सुरू असलेल्या टेक फेस्टदरम्यान चेंगराचेंगरी (KOCHI STAMPEDE) झाल्याची घटना शनिवार 25 नोव्हेंबर रोजी घडली. दरम्यान या चेंगराचेंगरीत चार जणांचा मृत्यू झाला असून 46 जण जखमी झाले आहेत. टेक फेस्टमध्ये गाण्याचा कार्यक्रम सुरू असताना ही घटना घडली. अचानक पाऊस सुरु झाल्याने कार्यक्रमादरम्यान एकच धावपळ सुरु झाली. मृतांमध्ये दोन मुली आणि दोन मुलांचा समावेश आहे. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. दरम्यान या विद्यापीठाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात 2000 हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात.



कार्यक्रमादरम्यान पाऊस पडला. त्यामुळे पावसापासून वाचण्यासाठी विद्यार्थ्यांनी अचानक स्टेजसमोरील बाजूकडे धाव घेतली. त्यामुळे गर्दी वाढली आणि चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. विद्यापीठात तीन दिवसीय टेक फेस्टचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा शनिवार 25 नोव्हेंबर रोजी शेवटचा दिवस होता. गायिका निकिता गांधी आणि ध्वनी भानुशाली कार्यक्रम करत असताना ही घटना घडली. एका प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार, केवळ तिकीटधारकांना कार्यक्रमात प्रवेश देण्यात आला होता. तसेच आला होता. तथापि, मैफिलीदरम्यान अनेक स्थानिक रहिवासी देखील सभागृहाबाहेर होते.अचानक पाऊस सुरू होताच सर्व प्रेक्षक स्टेजच्या दिशेने धावले. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी कोझिकोड येथील सरकारी अतिथीगृहात तातडीची बैठक घेतली आणि विद्यार्थ्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला. विजयन यांनी रविवारी उत्तर जिल्ह्यात सुरू असलेल्या नवा केरळ सदस कार्यक्रमासंदर्भात नियोजित सर्व सांस्कृतिक आणि कला कार्यक्रम रद्द करण्याची घोषणा केली. सर्व जखमींवर उपचार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. अपघाताबाबत केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितले की, जखमींच्या उपचारासाठी कलामासेरी मेडिकल कॉलेजमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. या अपघातात 4 जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन मुलं आणि दोन मुलींचा समावेश आहे. एर्नाकुलमचे जिल्हाधिकारी एनएसके उन्मेश यांनी सांगितले की, जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर आम्ही शहरातील सर्व रुग्णालयांना सतर्क केले असून, मृतांची ओळख पटलेली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठातील खुल्या सभागृहात चेंगराचेंगरी झाली. कार्यक्रमाला इतर महाविद्यालयातील विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मृतांची ओळख पटलेली नाही

गायिका निकिता गांधी आणि ध्वनी भानुशाली कार्यक्रम करत असताना ही घटना घडली. एका प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार, केवळ तिकीटधारकांना कार्यक्रमात प्रवेश देण्यात आला होता. तसेच आला होता. तथापि, मैफिलीदरम्यान अनेक स्थानिक रहिवासी देखील सभागृहाबाहेर होते.अचानक पाऊस सुरू होताच सर्व प्रेक्षक स्टेजच्या दिशेने धावले. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी कोझिकोड येथील सरकारी अतिथीगृहात तातडीची बैठक घेतली आणि विद्यार्थ्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला.मृतांमध्ये दोन मुलं आणि दोन मुलींचा समावेश आहे. एर्नाकुलमचे जिल्हाधिकारी एनएसके उन्मेश यांनी सांगितले की, जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर आम्ही शहरातील सर्व रुग्णालयांना सतर्क केले असून, मृतांची ओळख पटलेली नाही.

कार्यक्रमादरम्यान पाऊस पडला. त्यामुळे पावसापासून वाचण्यासाठी विद्यार्थ्यांनी अचानक स्टेजसमोरील बाजूकडे धाव घेतली. त्यामुळे गर्दी वाढली आणि चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. विद्यापीठात तीन दिवसीय टेक फेस्टचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा शनिवार 25 नोव्हेंबर रोजी शेवटचा दिवस होता.

# कामगारांच्या सुटकेला विलंब का?

## जवळपास दोन आठवडे बचाव मोहीम सुरू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

उत्तरकाशी बोगदा दुर्घटनेत अडकलेल्या कामगारांच्या सुटकेसाठी जवळपास दोन आठवडे बचाव मोहीम सुरू होती. मुळात ही दुर्घटना कशी घडली, या प्रश्नाइतकाच कामगारांच्या सुटकेला विलंब का झाला, हा चर्चेचा विषय ठरला आहे. उत्तराखंडमध्ये चारधाम प्रकल्पाचा भाग असलेल्या सिल्क्यारा ते बारकोट या पाच किलोमीटरच्या बांधकामाधीन बोगद्याचा काही भाग १२ नोव्हेंबरला कोसळला. बोगद्याच्या सिल्क्यारा दिशेकडील सुमारे ६० मीटरचा भाग खचल्याने ४१ कामगार अडकले.




बोगद्याच्या बांधून तयार असलेल्या दोन किलोमीटर भागात हे कामगार अडकले होते. तिथे वीज आणि पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. कामगारांना पाइपलाइनद्वारे अन्नासह जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात आला. अत्याधुनिक कॅमेऱ्याद्वारे घेतलेली या कामगारांची चित्रफित यंत्रणांनी प्रसृत केली आणि कामगारांच्या सुरक्षिततेची खात्री पटण्याबरोबरच त्यांच्या सुटकेसाठी आशेचा नवा किरण दिसू लागला. तेल व नैसर्गिक वायू महामंडळ (ओएनजीसी), सतलज जलविद्युत निगम, रेल विकास निगम लिमिटेड, राष्ट्रीय महामार्ग व पायाभूत सुविधा विकास महामंडळ, तेहरी हायड्रो डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या पाच संस्था बचाव मोहिमेत सहभागी झाल्या. या मोहिमेत बचावकार्याची पंचसूत्री ठरवून या पाचही संस्थांना त्यांच्या कौशल्याप्रमाणे वेगवेगळ्या ठिकाणी खोदकामाची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

शिवाय, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन आणि इंडो-तिबेट बॉर्डर पोलीस या यंत्रणांचे १६० कर्मचारी घटनास्थळी मदतकार्यात सहभागी झाले होते. हिमालयीन भागांत रस्ते, रेल्वे प्रकल्प राबविणे हे नेहमीच आव्हानात्मक असते. मात्र, दुर्घटना घडली तरी बचावकार्य लवकर होणे अपेक्षित असते. मायक्रो टनेलिंग तज्ज्ञ ख्रिस कूपर आणि इंटरनॅशनल टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस असोसिएशनचे अध्यक्ष अरनॉल्ड डिक्स यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र, राज्य पातळीवरील डझनभर संस्था कार्यरत असताना बचावकार्यास विलंब का झाला, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. त्यावर, भूस्खलन आणि दगडांच्या विशिष्ट रचनेमुळे बचावकार्यात अडथळे आल्याचे यंत्रणांचे म्हणणे आहे. एकाच वेळी पाच पातळ्यांवर बचावकार्य सुरू होते.

# महुआ मोईत्रांची सीबीआय चौकशी सुरू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

तृणमूल खासदार महुआ मोईत्रा यांच्या कॅश फॉर क्वेरी अर्थात प्रश्न विचारण्याच्या बदल्यात पैसे घेण्याच्या प्रकरणात सीबीआयची एंट्री झाली आहे. महुआ मोईत्रा यांची सीबीआय चौकशी सुरु करण्यात आली आहे. लोकपालांनी दिलेल्या निर्देशांनुसार हा तपास सुरु करण्यात आला आहे. सीबीआयने या प्रकरणाची प्राथमिक चौकशी सुरु केली आहे. आता सीबीआय ही तपास यंत्रणा महुआ मोईत्रा यांच्यावर गुन्हा दाखल करावा की नाही याचा निर्णय घेणार आहे. प्राथमिक तपासणीच्या अंतर्गत सीबीआय थेट कुणाला आरोपी ठरवू शकत नाही तसंच कुणाला अटकही करु शकत नाही. चौकशी करण्याचा आणि कागदपत्रं तपासण्याचा अधिकार या एजन्सीला आहे. त्यामुळे या प्रकरणात महुआ मोईत्रा यांची चौकशी होऊ शकते. या प्रकरणात सीबीआयने सर्वोच्च न्यायालयाचे वकील जय अनंत देहद्राई यांनी तक्रार दाखल केली. त्यांनी हा आरोप केला होता की महुआ मोईत्रा यांनी व्यावसायिक दर्शन हिरानंदानी यांच्याकडून पैशांच्या मोबदल्यात प्रश्न विचारले. त्यांच्याकडून लाच स्वीकारली आणि मोदी सरकारला अडचणीत आणण्यासाठी गौतम अदाणींवरुन प्रश्न विचारण्यात आले होते. दर्शन हिरानंदानी यांनी हा आरोप केला की तृणमूलच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी मला एक इमेल आयडी पाठवला होता. ज्यावर मी त्यांना माहिती पाठवू शकत होतो तसंच त्यांना प्रश्न कुठले विचारायचे आहेत याची चर्चा सुरु करु शकतो. तसंच महुआ मोईत्रा यांनी त्यांचा लॉग इन पासवर्डही मला दिला होता असाही आरोप दर्शन हिरानंदानी यांनी केला होता.

# '12वी फेल' ऑस्करच्या शर्यतीत सामिल!

विक्रांत मेस्सी स्टारर 12वी फेल हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होऊन एक महिना पूर्ण झाला आहे. विधू विनोद चोप्रा दिग्दर्शित या चित्रपटाला समीक्षकांसोबतच प्रेक्षकांचाही चांगला प्रतिसाद मिळाला होता. विधू विनोद चोप्रा आणि विक्रांत मेस्सी अभिनीत या चित्रपटाने केवळ भारतातच नाही, तर जगभरातही चांगली कमाई केली. या चित्रपटात विक्रांत मेस्सीने आपल्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकलली. आता या चित्रपटाने आणखी एक कमाल केली आहे. विक्रांत स्टारर 12 वी फेल हा चित्रपट 96 व्या ऑस्कर पुरस्कारांसाठी पाठवण्यात आला आहे. या चित्रपटाला ऑस्कर पुरस्कारासाठी स्वतंत्र नामांकन देण्यात आले आहे. अभिनेता विक्रांतने साहित्य आज तक




2023 मध्ये चाहत्यांना ही माहिती दिली. '12वी फेल' ची कथा अनुराग ठाकूर यांनी लिहिलेल्या पुस्तकातून घेतली आहे. ज्यामध्ये IPS अधिकारी मनोज कुमार यांचा जीवन प्रवास दाखवण्यात आला आहे. चित्रपटाच्या कथेबद्दल बोलायचं झालं तर चंबळमधील एका तरुणाने बारावीत नापास होऊनही आयपीएस अधिकारी बनण्याचे त्याचे स्वप्न कसे पुर्ण केले ही प्रेरणादायी कहानी या चित्रपटात दाखवण्यात आली आ हे . या चित्रपटात अनंत जोशी, अंशुमन पुष्कर, मेधा शंकर आणि गीता अग्रवाल यांनीही महत्वाच्या भुमिका साकारल्या आहेत. यंदा अनेक भारतीय स्वतंत्र चित्रपट ऑस्करला गेले आहेत. यामध्ये आर माधवनचा 'रॉकेटरी: द नंबी इफेक्ट', एसएस राजामौलीचा 'आरआरआर' आणि विवेक अग्निहोत्रीचा 'द काश्मीर फाइल्स' यांचा समावेश आहे. संजय दत्तचा 'लगे रहो मुन्नाभाई' आणि भगनानीचा 'यंगिस्तान' या चित्रपटांनी देखील स्वतंत्र चित्रपट यादीत ऑस्करमध्ये एंट्री केली होती.

# दोनदा मोडलं लग्न, प्रेमासाठी धर्मही बदलला



बॉलिवूडची 'ड्रामा क्वीन' राखी सावंत (RAKHI SAWANT) आज आपला 45 वा वाढदिवस साजरा करत आहे. राखी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. 'ड्रामा क्वीन' म्हणून लोकप्रिय असलेली राखी कधी कोणत्या कारणाने चर्चेत येईल हे सांगता येणार नाही. राखी सावंतचं दोनदा लग्न मोडलं आहे. तसेच प्रेमासाठी तिने धर्मही बदलला. पण तरीही आज वयाच्या 45 व्या वर्षी ती सिंगल आयुष्य जगत आहे. राखी सावंतने वैयक्तिक आयुष्यात काही चांगलं काम केलेलं नाही. कधी 'बिग बॉस' (BIGG BOSS) तर कधी म्युझिक व्हिडीओमुळे ती चर्चेत असते. पण गेल्या काही दिवसांपासून ती वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. राखी सावंतने रितेशसोबत गपचुप लग्न केलं होतं. पण नंतर काही कारणाने हे लग्न मोडलं. राखीने 'बिग बॉस 15' (BIGG BOSS 15) या कार्यक्रमाच्या माध्यमातून रितेशची जगाला ओळख करून दिली होती. राखीआधी रितेशचं लग्न झालं होतं. तसेच त्याला मुलंदेखील होती. पण 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडताना राखी आणि रितेश वेगळे झाले होते. दोघांनी एकमेकांवर अनेक आरोप केले होते. रितेशसोबतचं नातं तोडल्यानंतर राखी आदिल खान दुर्रानीला (ADIL KHAN DURRANI) डेट करायला लागली. सोशल मीडियावर निकाहचे फोटो शेअर करत तिने चाहत्यांना यासंदर्भात माहिती दिली होती. आदिल खान दुर्रानीसाठी राखीने धर्मदेखील बदलला होता. तिने राखी ऐवजी तिचं नाव फातिमा असं ठेवलं होतं. पण राखी आणि आदिलचं नातं फार काळ टिकलं नाही. अखेर त्यांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतला. राखी सावंतला ड्रामा क्वीनसह कॉन्ट्रोवर्सी क्वीनदेखील म्हटले जाते. राखीने 'अग्निचक्र' या सिनेमाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. 'जोरू का गुलाम', 'जिस देश में गंगा रहा है' अशा अनेक सिनेमांत राखीने छोट्या-मोठ्या भूमिका केल्या आहेत. पण 2005 साली प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या 'परदेसिया' या गाण्याने राखी लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली. या गाण्यामुळे राखी 'आयटम गर्ल' म्हणून ओळखली जाऊ लागली. राखीने आजवर अनेक रिॲलिटी शो केले आहेत.

## 'झिम्मा 2'चा खेळही हाऊसफुल्ल!

कोरोनाकाळानंतर प्रदर्शित होणारा पहिला मराठी सिनेमा म्हणून 'झिम्मा' (Jhimma) या सिनेमाकडे पाहिलं जातं. हिंदीचे बिग बजेट सिनेमे कोरोनानंतर प्रदर्शित करायला निर्माते घाबरत होते. त्यावेळी 'झिम्मा' हा सिनेमा प्रदर्शित करण्याचं धाडस मराठी मनोरंजनसृष्टीने केलं. 'झिम्मा' हा सिनेमा त्यावेळी फक्त प्रदर्शित झाला नाही तर या सिनेमाने प्रेक्षकांची मनं जिंकण्यासोबत बॉक्स ऑफिसही जिंकलं. 'झिम्मा'नंतर या सिनेमाच्या दुसऱ्या भागाची अर्थात 'झिम्मा 2'ची (Jhimaa 2) चाहते प्रतीक्षा करत होते. अखेर 24 नोव्हेंबर 2023 रोजी हा बहुप्रतिक्षित सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला.

## एकटीच लेकराला कसं सांभाळतीस?

इलियाना डिक्रूझ ही एक प्रतिभावान बॉलिवूड अभिनेत्री आहे, जी एका मुलाची आई झाली आहे. इलियाना डिक्रूजने यावर्षी ऑगस्टमध्ये तिच्या गोंडस बाळाचा फोटो शेअर करून चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली होती. त्यानंतर सर्वजण अभिनेत्रीला तिच्या जोडीदाराबद्दल विचारत होते. आता इलियानाने चाहत्यांच्या या प्रश्नांची उत्तरेही दिली. इलियानाने ऑस्ट्रेलियन बॉयफ्रेंड मायकलला (MICHAEL DOLAN) दीर्घकाळ डेट केले, त्यानंतर या वर्षी दोघांनी लग्न केले. एका चाहत्याने इलियानाला तिचा नवरा आणि बाळाच्या वडिलांबद्दल विचारले, ज्याला फोटोसह उत्तर देत बोलती बंद केली. इलियाना डिक्रूझने अलीकडेच तिच्या इन्स्टाग्रामवर चाहत्यांशी खास संवाद साधला. चाहत्यांनी अभिनेत्रीला अनेक वेगवेगळे प्रश्न विचारले. दरम्यान, एका चाहत्याने इलियानाला तिच्या जोडीदाराबद्दल प्रश्न विचारला. इलियानाला विचारण्यात आले की ती आपल्या बाळाची एकटी कशी काळजी घेते? या प्रश्नाचे उत्तर देताना इलियानाने पतीसोबतचा एक फोटो शेअर केला. या फोटोमध्ये इलियाना आणि मायकल अँड्रयू नीबोन एकमेकांच्या डोळ्यात हरवले आहेत. या फोटोसोबत इलियानाने लिहिले, 'मी सिंगल नाही...' या पोस्टद्वारे इलियानाने सांगितले आहे की ती अविवाहित नाही आणि पतीसोबत तिच्या बाळाची काळजी घेत आहे. यादरम्यान एका चाहत्याने असेही विचारले की, 'गरोदर असताना आई सोबत होती का?' यावर अभिनेत्रीने तिच्या आईसोबतचा एक फोटो शेअर केला आणि सांगितले की आई तिच्यासोबत होती.



# शाहरुख खानच्या'डंकी'ने रिलीजआधीच केली 100 कोटींची कमाई

बॉलिवूडचा सुपरस्टार शाहरुख खानचा (SHAH RUKH KHAN) 'डंकी' (DUNKI) हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज आहे. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'पठाण' (PATHAAN), 'जवान' (JAWAN) या सिनेमानंतर आता 'डंकी' (DUNKI) हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाची सिनेरसिकांमध्ये चांगलीच क्रेझ आहे. 'डंकी' सिनेमाची घोषणा झाल्यापासून शाहरुखचे चाहते या सिनेमाची प्रतीक्षा करत आहे. 2023 मधला शाहरुखचा हा तिसरा सिनेमा आहे. राजकुमार हिरानी (RAJKUMAR HIRANI) यांनी या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. या सिनेमाच्या माध्यमातून शाहरुख खान पहिल्यांदाच राजकुमार हिरानी यांच्यासोबत काम करत आहे. शाहरुखचा 'डंकी' हा सिनेमा 21 डिसेंबर 2023 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. प्रभासच्या 'सालार'सोबत या सिनेमाची टक्कर होणार आहे. पिंकव्हिलाच्या रिपोर्टनुसार, 'डंकी' या सिनेमाचं




बजेट 120 कोटी रुपये आहे. शाहरुख खान (SHAH RUKH KHAN), राजकुमार हिरानी (RAJKUMAR HIRANI), तापसी पन्नू (TAAPSEE PANNU) आणि विकी कौशल (VICKY KAUSHAL) या सिनेमात मुख्य भूमिकेत आहेत. 75 दिवसांत या बहुचर्चित सिनेमाचं शूटिंग पूर्ण झालं आहे. 'डंकी' या सिनेमाचे नॉन थिएट्रिकल राईट्स 'जवान'च्या किंमतीत विकले गेले आहेत. 'डंकी' या सिनेमाचे राईट्स 100 कोटींमध्ये विकले गेले आहेत. याआधी शाहरुखचा (SHAH RUKH KHAN) 'जवान' (JAWAN) हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. 300 कोटींच्या बजेटमध्ये या सिनेमाची निर्मिती करण्यात आली आहे. भारतात या सिनेमाने 640.25 कोटींची कमाई केली आहे. तर जगभरात या सिनेमाने 1160 कोटींचा गल्ला जमवला आहे. शाहरुखच्या 'डंकी' या सिनेमाकडून प्रेक्षकांच्या खूप अपेक्षा आहे. 'जवान' आणि 'पठाण' या सिनेमांनी जगभरात 2000 कोटींचं बॉक्स ऑफिस कलेक्शन जमवलं होतं. शाहरुखच्या 'पठाण', 'जवान' या सिनेमांनी 2023 हे वर्ष गाजवलं आहे. आता त्याचा 'डंकी' हा सिनेमा बॉक्स ऑफिस गाजवण्यासाठी सज्ज आहे. वर्षाच्या शेवटी 'डंकी' हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कमाई करणार आहे. त्यामुळे या सिनेमाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. या सिनेमासाठी किंग खानने चांगलच मानधन घेतलं आहे.

# हार्दिक पंड्या पुन्हा मुंबई इंडियन्सकडे?

## 15 कोटी रुपये खर्चून हार्दिकला ताफ्यात घेणार

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पदार्पणाच्या हंगामातच गुजरात टायटन्स संघाला आयपीएल स्पर्धेचं जेतेपद मिळवून देणारा कर्णधार हार्दिक पंड्या मुंबई इंडियन्सकडे परतण्याची चिन्हं आहेत. आयपीएलच्या २०२४ हंगामासाठी १९ डिसेंबरला दुबईत लिलाव होणार आहे. पण त्याआधी २६ नोव्हेंबरला ट्रान्सफर विंडोचा अवधी संपत आहे. ट्रान्सफर विंडोअंतर्गत संघांना परस्पर सामंजस्याने खेळाडूंची अदलाबदल करता येते. हार्दिकच्या घरवापसीबाबत गुजरात टायटन्स किंवा मुंबई इंडियन्स संघव्यवस्थापनाने यासंदर्भात कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.**

२०१५ मध्ये हार्दिकने मुंबई इंडियन्ससाठीच खेळताना आयपीएल पदार्पण केलं होतं. क्रिकइन्फो वेबसाईटने दिलेल्या वृत्तानुसार मुंबई इंडियन्स तब्बल १५ कोटी रुपये खर्चून हार्दिकला ताफ्यात घेणार असल्याचं वृत्त आहे. सगळं जुळून आलं तर आयपीएल स्पर्धेतला हा सगळ्यात मोठा ट्रेडऑफ ठरेल. २०२२ मध्ये मोठ्या लिलावापूर्वी मुंबई इंडियन्सने रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह आणि कायरेन पोलार्ड यांना रिटेन केलं होतं. हार्दिकला रिटेन न करता पोलार्डला संघात कायम ठेवल्याने मुंबई इंडियन्सच्या धोरणांवर टीकाही झाली होती.

मुंबईने हार्दिकच्या रुपात गमावलेली संधी आयपीएलमधील नवा संघ गुजरात टायटन्सने हेरली. हार्दिक पंड्याचं नेतृत्व आणि आशिष नेहरा यांचं मार्गदर्शन या जोडगोळीने पहिल्याच हंगामात संघाला जेतेपद मिळवून दिलं. हार्दिकच्या नेतृत्वाचं कौतुक



झालं होतं. या यशातूनच हार्दिकला भारताच्या ट्रेन्टी२० संघाची कमान मिळाली होती. आयपीएलच्या अंतिम लढतीत हार्दिकच सामनावीर होता. २०२३ मध्येही गुजरात टायटन्स संघाने अंतिम फेरीत धडक मारली. मात्र चेन्नईने त्यांना नमवलं. हार्दिकच्या नेतृत्वात गुजरातने प्राथमिक फेरीअखेर गुणतालिकेत अव्वल स्थान राखत प्लेऑफ्समध्ये प्रवेश केला होता. गुजरातसाठी दोन हंगाम खेळताना हार्दिकने ३० डावात ४१.६५च्या सरासरीने ८३३ धावा केल्या आहेत. त्याने ११ विकेट्सही पटकावल्या आहेत. नुकत्याच झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या लढतीदरम्यान हार्दिक दुखापतग्रस्त झाला होता. हार्दिकला संघात समाविष्ट करण्यासाठी मुंबईला काही खेळाडूंना रिलीज करुन तिजोरीत पुंजी जमवावी लागेल. लिलावावेळी प्रत्येक संघाला ५ कोटी रुपये अतिरिक्त मिळणार आहेत. मुंबई इंडियन्सने सर्वकाही जुळून आणलं तर ट्रेडऑफ होणारा हार्दिक हा आयपीएलमधला तिसरा कर्णधार असेल. याआधी रवीचंद्रन अश्विन किंग्ज इलेव्हन पंजाबकडून दिल्लीकडे तर अजिंक्य रहाणे राजस्थानकडून दिल्लीकडे आला होता. गुजरात टायटन्स संघाची निर्मिती झाली त्यावेळी त्यांनी प्रत्येकी १५ कोटी रुपये खर्चून हार्दिक आणि रशीद खान यांना ताफ्यात समाविष्ट केलं. मुंबई इंडियन्सने हार्दिकचं नैपुण्य हेरत त्याला संघात घेतलं. याच संघाच्या माध्यमातून अष्टपैलू खेळाडू म्हणून त्याने ओळख प्रस्थापित केली. २०१५ मध्ये अवघ्या १० लाख रुपयात मुंबईने हार्दिकला घेतलं होतं. मुंबईच्या २०१५, २०१७, २०१९ आणि २०२० आयपीएलविजेत्या संघाचा हार्दिक अविभाज्य घटक होता. २०२२ हंगामापूर्वी मुंबईने हार्दिकला सोडलं त्याचवेळी सगळ्यांनी आश्चर्य व्यक्त केलं होतं. कारण आधीच्या सर्व लिलावांवेळी हार्दिकला मुंबईने रिटेन केलं होतं. रोहित शर्मा भारतासाठी ट्रेन्टी२० खेळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे हार्दिककडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात येण्याची शक्यता आहे.

### शेफर्ड आता मुंबई इंडियन्स ताफ्यात

दरम्यान अन्य ट्रेडऑफ्समध्ये लखनौ सुपरजायंट्सने रोमारिओ शेफर्डला रिलीज केलं आहे. अष्टपैलू शेफर्ड आता मुंबई इंडियन्ससाठी खेळताना दिसेल. देवदत्त पड्डीकल आता राजस्थान रॉयल्सऐवजी लखनौ सुपरजायंट्स संघासाठी खेळताना दिसेल. या बदल्यात राजस्थानने वेगवान गोलंदाज अवेश खानला संघात समाविष्ट केलं आहे. जिगरबाज अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सने आयपीएल २०२४साठी उपलब्ध नसल्याचं कळवलं आहे. त्यामुळे चेन्नई सुपर किंग्सला संघात बदल करावे लागतील.

# धोनीकडून रिंकू शिकला फिनिशिंगची कला?

## रिंकूने शानदार फिनिशिंग करत भारताला विजय मिळवून दिला

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पहिल्या टी 20 सामन्यात रिंकू सिंह याने शानदार फिनिशिंग करत भारताला अखेरच्या चेंडूवर विजय मिळवून दिला. विशाखापट्टणम येथे झालेल्या सामन्यात रिंकूने शानदार कामगिरी केली. सूर्या आणि ईशान किशन यांनी शानदार अर्धशतके ठोकली, पण त्यानंतर भारताची फलंदाजी ढेपाळली. पण अखेरीस रिंकू सिंह याने शानदार फलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला. अखेरच्या चेंडूवर एका धावेची गरज असताना रिंकूने षटकार मारत विजय मिळवून दिला.**




पहिल्या टी 20 सामन्यानंतर रिंकूने आपल्या विस्फोटक खेळीवर प्रतिक्रिया दिली. रिंकू सिंहने दबावाची परिस्थिती कशी हाताळली, याबाबत सांगितले. महेंद्रसिंग धोनीने शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजीबाबत काय सल्ला दिला होता, हे त्याने सांगितले. बीसीसीआयने याबाबतचा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. त्यामुळे रिंकू फिनिशिंगबद्दल बोलत आहे. तो म्हणाला, “आम्ही सामना जिंकला हे चांगले झाले. मी जेव्हा फलंदाजीला गेलो तेव्हा परिस्थिती माझ्यासाठी योग्य होती. मी नेहमी जे केले ते मला करावे लागले." रिंकू सिंहने धोनीचा उल्लेख करत म्हणाला की, "माही भाई (महेंद्र सिंह धोनी) सोबत एक-दोन वेळा चर्चा झाली. तुम्ही जितके शांत राहाल आणि जितके सरळ सरळ मारण्याचा प्रयत्न कराल तितके चांगले होईल, असे माही भाईने मला सांगितले. मी तेच करण्याचा प्रयत्न करतो. मी शांत राहतो. कोणताही रिॲक्शन देत नाही. याचा मला खूप फायदा झाला. अखेरच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या थरारक सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा दोन विकेटने पराभव केला. ऑस्ट्रेलियाने दिलेल्या 209 धावांचे आव्हान भारताने अखेरच्या चेंडूवर दोन विकेट राखून पूर्ण केले. फिनिशर रिंकूने षटकार ठोकत भारताला विजयी केले. त्याआधी सूर्यकुमार यादव आणि ईशान किशन यांनी झंझावती अर्धशतके ठोकली. ऑस्ट्रेलियाकडून तनवीर संघा याने दोन विकेट घेतल्या. जोश इंग्लिश याने ठोकलेल्या झंझावती शतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने 208 धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरदाखल भारताने हे आव्हान दोन विकेट राखून सहज पार केले. सूर्या आणि ईशान किशन बाद झाल्यानंतर भारताची फलंदाजी ढेपाळली. एकापाठोपाठ एक विकेट गेल्या. तिलक वर्मा 12 धावा काढून बाद झाला. अक्षर पटेल दोन धावांचे योगदान देऊ शकला. रवि बिश्नोई आणि अर्शदीप यांना खातेही उघडता आले नाही. एका बाजूला विकेट पडत असताना दुसऱ्या बाजूला रिंकू याने फिनिशिंग केले. अखेरच्या षटकात भारताने तीन विकेट्स गमावल्या. पण रिंकून हार मानली नाही.

### ऑस्ट्रेलियाचा दोन विकेटने पराभव

रिंकून षटकार मारुन टीम इंडियाला विजय मिळवून दिला. रिंकूने 14 चेंडूत 22 धावांची खेळी केली. "माही भाई (महेंद्र सिंह धोनी) सोबत एक-दोन वेळा चर्चा झाली. तुम्ही जितके शांत राहाल आणि जितके सरळ सरळ मारण्याचा प्रयत्न कराल तितके चांगले होईल, असे माही भाईने मला सांगितले. मी तेच करण्याचा प्रयत्न करतो. मी शांत राहतो. कोणताही रिॲक्शन देत नाही. याचा मला खूप फायदा झाला. अखेरच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या थरारक सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा दोन विकेटने पराभव केला.